मासेमार नौकांवर संदेशवहन,मासळीचा शोध घेणे
इ.अत्याधुनिक यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी
अर्थसहाय्य देण्यासची योजना राबविण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक-मत्स्यवि-१००४/१५५८१/(१९१) पदुम १४**
**मंत्रालय विस्तार,मुंबई-४०००३२.**
**दिनांकः-४ नोव्हेंबर,२००४.**

**वाचाः-**

१) शासन निर्णय,कृषि व पदुम विभाग,क्र.मत्स्यवि-१०९६/१४४३२/(४९१)/ पदुम-१४,दिनांक १२ ऑक्टोबर,१९९९.
२) शासन निर्णय,कृषि व पदुम विभाग,क्र.मत्स्यवि-१००३/१३७४२/(११८)/ पदुम-१४,दिनांक २१ ऑक्टोबर,२००३.
३) आयुक्त,मत्स्यव्यवसाय यांचे क्र.मत्स्य/सा/०६११०६/३५४-२००२, दिनांक १६/७/२००४ चे पत्र.

**प्रस्तावना**ः-

संकटकाळात मच्छिमारांना एकमेकांशी संपर्क साधणे सोपे व्हावे,त्यांना समुद्रामध्ये मासळीच्या साठयाची योग्य माहिती मिळावी, या करिता तसेच मच्छिमारांना विशिष्ट दिशेला कमीत कमी अंतराच्या मार्गाने पोहचण्याच्या दृष्टीने कोकण विकासाच्या कालबध्द कार्यक्रमांतर्गत २५ टन किंवा त्यापेक्षा जास्त वजनाच्या यांत्रिक नौकांवर बसविण्याकरिता वॉकी टॉकी सेट,एको साऊँडर व जी.पी.एस नेव्हीगेटर या सारखी अत्याधुनिक यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी, मच्छिमारांना अर्थसहाय्य देण्याची योजना,शासन निर्ण,कृषि व पदुम विभाग क्र.मत्स्यवि-१०९६/१४४३२/(४९१)/पदुम-१४,दिनांक १२ ऑक्टोबर,१९९९ अन्वये मंजूर करण्यात आलेली आहे. सदर योजना सन २००४-२००५ मध्ये पुढे चालू ठेवण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**ः-

कोकण विकासाच्या कालबध्द कार्यक्रमांतर्गत २५ टन किंवा त्यापेक्षा जास्त वजनाच्या यांत्रिक नौकांवर एको साऊंडर,जी.पी.एस.नेव्हीगेटर व वॉकी टॉकी या सारखी अत्याधुनिक यंत्रसामुग्री बसविण्यासाठी अर्थसहाय्य देण्याची योजना सन २००४-२००५ मध्ये पुढे चालू ठेवण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. ज्या लाभार्थीनी यापूर्वी शासनाकडून शासकीय योजनेतून यांत्रिक नौकांसाठी लाभ घेतला असेल त्यांनाही खालील संत्रसामुग्रीच्या खरेदीवर अनुदान देय आहे.मात्र ज्यांना खालील यंत्रसामुग्रीसाठी यापूर्वी शासनाच्या इतर योजनांतून अर्थसहाय्य प्राप्त झाले असेल तर अशा लाभार्थ्यांचा या योजनेंतर्गत पुन्हा अनुदान देण्यात येऊ नये.

२. या योजनेंतर्गत उपरोक्त यंत्रसामुग्रीवर खालीलप्रमाणे अर्थसहाय्य देय राहील. उर्वरित रक्कम लाभार्थीने स्वतः अथवा बँक/वित्तीय संस्थांमार्फत कर्जरुपाने उभी करावी. या योजनेतर्गत लाभार्थी निवडीच्या अटी,शर्ती व कार्यपध्दती या शासन निर्णयाच्या परिशिष्ट-१ मध्ये दर्शविण्यात आल्या आहेत.

| यंत्रसामुग्री | अर्थसहाय्याचे प्रमाण व अर्थसहाय्याची कमाल मर्यादा |
|---|---|
| एको साऊंडर | यंत्रसामुग्रीच्या किंमतीच्या २५ टक्के परंतु रु.१५,०००/- च्या मर्यादेत |
| जीपीएस नेव्हीगेटर | यंत्रसामुग्रीच्या किंमतीच्या २५ टक्के परंतु रु.७५,०००/- च्या मर्यादेत |
| वॉकी टॉकी | यंत्रसामुग्रीच्या किंमतीच्या २५ टक्के परंतु रु.१२,५००/- च्या मर्यादेत |

३. या योजनेसाठी येणारा खर्च खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व उपलब्ध अर्थसंकल्पित तरतुदीच्या मर्यादेत करण्यात यावा.

मागणी क्र.डी-५.
२४०५,मत्स्यव्यवसाय
१०३,सागरी मत्स्यव्यवसाय
पंचवार्षिक योजनांतर्गत योजना
१०३ (०२) (११) यांत्रिक नौकेवर अत्याधुनिक यंत्रसामुग्री बसविणे
राज्य योजनेअंतर्गत योजना (२४०५ ११७ १)

४. या योजनेसाठी संबंधीत जिल्यांचे सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक यांना आहरण व सवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. आयुक्त, मत्स्यव्यवसाय,मुंबई यांनी या योजनेचा प्रगती अहवाल प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेपूर्वी शासनास पाठवावा.

५. हे आदेश वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र-१०००/प्र.क्र.४६/२००१/विनियम,दिनांक ११ जुलै,२००१ मधील वित्तीय शक्ती क्र.२७ (२)

(अ) अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(र.ग.सय्यद)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

आयुक्त,मत्स्यव्यवसाय,महाराष्ट्र राज्य,मुंबई
प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक,मुंबई
सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक,मुंबई/ठाणे/अलिबाग/रत्नागिरी/सिंधुदुर्ग (मालवण)
महालेखापाल,महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता),मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
निवासी लेखा अधिकारी,मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी,ठाणे/रायगड(अलिबाग)/रत्नागिरी/सिंधुदुर्ग
उपकोषागार अधिकारी,मालवण,जि.सिंधुदुर्ग व पालघर जि.ठाणे
नियोजन विभाग (१४३२), मंत्रालय,मुंबई
वित्त विभाग (व्यय-१अर्थसंकल्प-१४),मंत्रालय,मुंबई
कक्ष अधिकारी (पदुम-१२,१३ व १६)कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई
निवडनस्ती